# एल.ए.आर.क्र.२१२/२०१९
# CNRNOMHOS120001872019
# राजेंद्र +१ वि. शासन व इतर
# नि.क्र. २२ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज हा अर्जदार यांनी मुळ भु-संपादन निर्देशन अर्जामध्ये त्यांच्या नावाची दुरुस्ती करण्यासाठी दिलेला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे मुळ भु-संपादन निर्देशन अर्ज दाखल करतेवेळी त्यावेळी उपलब्ध असलेल्या अभिलेखाप्रमाणे व कागदपत्राप्रमाणे अर्जदार यांनी त्यांच्या नावाने भु-संपादन निर्देशन अर्ज दाखल केला होता. तथापि, तो दाखल केल्यानंतर अर्जदार यांनी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये त्यांची आडणावे बदलुन घेतल्यामुळे अर्जदार यांना त्याप्रमाणे प्रस्तुतच्या मुळ भु-संपादन निर्देशन अर्जामध्ये त्यांच्या आडणावातील दुरुस्ती करण्याची आहे. सदर दुरुस्ती प्रमाणे त्यांना निशाणी क्र. १ मध्ये त्याचे आडणाव जे "माळी" म्हणुन नमुद केले आहे त्याऐवजी त्यांचे आडणाव "मोहळकर" असे दुरुस्ती करुन पाहिजे आहे. सदरची प्रस्तावित दुरुस्ती ही औपचारीक स्वरुपाची असल्यामुळे ती मंजुर करण्याची विनंती केली आहे.

२. गैरअर्जदार यांनी प्रस्तुत अर्जास हरकत घेतली आहे.

३. अर्ज त्यावरील म्हणणे व अभिलेखनाचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला. अर्जदारातर्फे विधीज्ञांनी युक्तीवादादरम्यान कथन केले की, प्रस्तुत अर्जदार यांनी याच प्रकारची मागणी केलेली दुरुस्ती भु-संपादन निर्देशन अर्ज क्र. ५०८/२०१४ यामध्ये मंजुर करण्यात आलेली आहे.

४. निशाणी क्र. १ चे अवलोकन करता असे दिसून येते की, दिनांक २६.०६.२००८ रोजी प्रस्तुतचा मुळ भु-संपादन निर्देशन अर्ज हा प्रथमत: विशेष भु-संपादन अधिकारी यांच्याकडे दाखल करण्यात आला होता. अर्जदारातर्फे प्रस्तुत अर्जाच्या पृष्ठयार्थ निशाणी क्र. २३ येथे शपथपत्र दाखल केले आहे. दस्त ऐवज यादी

निशाणी क्र. २४ सोबत अर्जदाराने प्रस्तुत अर्जाच्या पृष्ठयार्थ महाराष्ट्र शासनाचे राजपत्र फेब्रुवारी २००८ रोजीचे दाखल केले आहे. त्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, त्यामध्ये अर्जदार यांचे आडणावे बदलण्यात आली असून त्यांचे आडणाव माळी ऐवजी मोहळकर असे करण्यात आले आहे. त्यामुळे अर्जदाराने प्रस्तुत अर्जातील कथनाच्या पृष्ठयार्थ कागदोपत्री पुरावा दिल्याचे दिसून येते. तसेच दस्त ऐवज यादी निशाणी क्र. २४ सोबत अर्जदार क्र. १ याने राजपत्राप्रमाणे त्याचे आडणावामध्ये जो बदल झालेला आहे त्या बदलाप्रमाणे त्याचे पॅनकार्ड व आधारकार्ड यांच्या छायांकित प्रती दाखल केलेल्या आहेत. त्यामुळे प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी मागणी केलेली त्यांच्या आडणावातील दुरुस्ती मंजुर करणे न्यायोचित ठरते. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. नि. क्र. २२ खालील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने प्रस्तुत अर्जदार यांनी योग्य ती दुरुस्ती निशाणी क्रमांक १ मध्ये आजपासून १४ दिवसांच्या आत करण्याचे आहे.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च हा प्रस्तुत अर्जदार यांनी सोसायचा आहे.

स्वा/-२४.०९.२०२४
(ए. पी. कुलकर्णी )
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
भूम.

दिनांक – २४/०९/२०२४

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom, District - Osmanabad. |
| Date | --- | 24/09/2024 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 24/09/2024 |
| Order uploaded on | --- | 24/09/2024 |